१९५६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
क्र. १२८९

श्री संत

# भटजी बापू महाराज ऊर्फ बाळकृष्णानंद स्वामी

यांचें

# काव्यमय चरित्र



( सांब दयेचें देणें )

REFBK-0008911

| : जन्म : | : मृत्यु : |
|---|---|
| श्रावण व॥ ९ शके १७६७ | वैशाख व॥ ११ शके १८५४ |

देवकन्या पुष्प २ रें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७०७२२ वि: चरित्र
क्रमांक ८४५५ नों: दि: २८।११।६०

# श्री संत भटजी बापू

ऊर्फ

## श्री बाळकृष्णानंद स्वामी

( हैद्राबाद )

यांचें

# काव्यमय चरित्र

चरित्र ९२८
REFBK-0008911

प्रथम आवृत्ति ] [ किंमत १२ आणे

: प्रकाशक :
श्री. रा. देव
देवनिवास, धाराशिव
(उस्मानाबाद)

प्रसिद्धी : मिति चैत्र शु॥ १ शके १८७८
१९५६

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

: मुद्रक :
रा. कृ. कुलकर्णी
विकास मुद्रणालय
८६५ सदाशिव, पुणें २.

श्री. सद्‌गुरु भटजी बापू ऊर्फ बाळकृष्णानंदस्वामी

हैद्राबादराज्य यांचे

काव्यमय–चरित्र

# – पुष्पांजलि –

–पृथ्वी–

समान सुखदु:खि जे म्हणुनि गाजले भूवरीं
अपूर्व पटुगायनीं सकल बोलते वैखरी
कधींच अतिथी कुणी विमुख धाडिला ना मुळीं
समर्पि भटजीगुरूचरणिं देव पुष्पांजलि

धाराशिव ) श्री. रा. देव

अनुक्रम.................... वि: ...................
क्रमांक ........ नों: दि: ..............

# प्रस्तावना

मानवी जीवनाची प्रस्तावना कशी करावी हें ज्यांच्या जीवन-यात्रेवरून समजून येते, अशा परम गवद्भक्त श्रीसग्दुरु भटजी बापू महाराज ऊर्फ श्री. बाळकृष्णानंदस्वामी यांच्या काव्यमय चरित्रास प्रस्तावना लिहिण्याचा सुयोग प्राप्त झाला आहे.

जग संतांच्या चरित्राकडे केवळ अलौकिक दृष्टीनेंच पहात असते. कांहीं भौतिक चमत्काराची रेलचेल ज्याच्या चरित्रांतून पुष्कळ आढळेल तो संत; अशी सामान्य माणसाची भावना असते. संत चमत्कार करीत नाहींत असें नाहीं. एकादा संत आपल्या अलौकिक तप:प्रभावानें कांहीं चमत्कार प्रसंगोपात करीत असेल. एवढ्यावरून तो संत असें ठरत नाहीं.

श्री मद्भागवतामध्यें श्रीकृष्णानीं उद्धवास जीं संतांचीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं ज्याच्या अंगीं बाणलीं असतील तोच संत. ती लक्षणें येणें प्रमाणें होत—

' निरपेक्षं मुनिं शांतं निर्वैरं समदर्शिनं '

मनुष्याच्या जीवनांत निरपेक्षता, शांतता, निर्वैरता समदर्शित्वादि परमोच्च भावना निर्माण होणें हाच फार मोठा चमत्कार होय.

कारण मानवी जीवन अनेक आशा आकांक्षांनी व्याप्त स्वार्थ लोलुप भेद भावनेनें युक्त विकारपूरित बनलेलें असतें. श्रेष्ठ श्रेष्ठ म्हणविणाऱ्या माणसाचे व्यवसायही या विकारांच्या वृद्धीस पोषक असेंच चालू असतात त्यामुळें त्यांचा आदर्श पुढें ठेवणाऱ्या जगांतही त्याच विकारांची वाढ होऊन परस्पर मत्सर, द्वेष निर्माण होऊन अनेक प्रकारचे संघर्ष निर्माण होतात; त्यामुळें सामाजिक स्थिरता नष्ट होते व समाजांत अशांति माजते. तिच्या नाशाकरितां केलेलें प्रयत्न फोफळ ठरतात.

अशा वेळीं संताचेंच आदर्श जीवन आचरणांत आणण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे.

कोणी म्हणेल संत हें सर्व प्रपंचाचा त्याग करून केवळ निवृत्ति मार्गाचाच अवलंब करतात. त्यांचें जीवन सामान्यांना अनुकरणीय कसें होईल ?

या प्रश्नाचें उत्तर हें कीं सर्वच संत यावत् प्रपंचाचा त्याग करून जगाच्या बाहेर रहातात असें नाहीं तर प्रपंचांतच राहून परमार्थ करून दुसऱ्यास करावयास शिकविणें हें त्यांचें कर्तव्य ते करित असतात.

परमार्थास प्रपंच आडवा येत नसून त्याची आसक्ति सोडली तर प्रपंच्याचाच परमार्थ होतो.

जर ती आसक्ति असेल तर बाह्यत: एखादा परमार्थी जरी दिसत असला तरी तो परमार्थाचा प्रपंच करीत असतो.

श्री. भटजी बापू हे परमार्थाचा प्रपंच करणारे नसून प्रपंचालाच परमार्थ बनविणाऱ्या '॥ अवघाचि संसार सुखाचा करीन ॥' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या परंपरेंतील होते हें त्यांच्या चरित्रावरून सिद्ध होते. त्यांनीं शेवटपर्यंत आपलें स्वधर्माचरण सोडलें नाहीं. त्यांच्या चरित्रावरून बोध घेतां येईल अशा अनेक गोष्टी आहेत.

॥ मुक्ताते निर्धारिता ॥ लाभे आपुलीच मुक्तता ॥

असें श्री ज्ञानेश्वरमहाराजांप्रमाणें आपलें जीवन सुखशांतीनें समृद्ध व्हावें असें ज्यास वाटत असेल त्यानें संतांच्या त्यागमय जीवनाचा आदर्शच आपल्यापुढें ठेवणें अवश्य आहे.

श्री. भटजी बापूचें चरित्र संपूर्ण त्यागमय होतें. तसेंच ईश्वरभाव हा जो संताच्या जीवनांतील स्थायीभाव तो त्याच्या चरित्रांतून जागजागीं आढळतो.

सर्वाभूती भगवन्निष्ठा ठेऊन सर्वाभूतीं अन्नदात, स्वत:चा पुत्र मृत असतांही गाणें ऐकण्यास आलेल्याना प्रेमानें सर्व दु:ख विसरून एक तासभर गाणें ऐकविणें व त्यांस संतुष्ट करणें हें श्रीमद्भागवतांत सांगित्याप्रमाणें खरें ईश्वरपूजन होय.

॥ संतोषं जनयेत् प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम् ॥

असें ईश्वरपूजन नित्य ते करीत असत, हें त्यांच्या चरित्रांतील अनेक प्रसंगावरून दिसून येतें.

सारांश हें चरित्र गृहस्थाश्रमी पुरुषांनाही आदर्शभूत आहे.

गृहस्थाश्रमी पुरुषांच्या संसारांत अनेक आपत्ति येतातच-त्यांत आपली चित्रवृत्ति कशी शांत ठेवावी हें त्यांच्या चरित्रावरून समजून येते.

जवळ कांहीं नसतांना देखील हजारोंनीं अन्नदान त्यांच्या येथें होत असे यांत "योगक्षेमं वहाम्यहं" ही प्रतिज्ञाच या रूपानें त्यांच्याकरितां भगवान् पूर्ण करीत होता असें म्हणावें लागतें.

आम्हांस भाग्यानें अनेक वेळीं त्यांच्या दर्शनाचा व संभाषणाचा सुयोग प्राप्त झाला होता. त्यावरून त्यांचा अध्यात्मिक अधिकार फार थोर होता हें कळून आलें.

विशेष म्हणजे त्यांच्या वर्तनांत कर्म, उपासना व ज्ञान यांचा समन्वय स्पष्टपणें दिसून येत असे. असो.

श्री. श्री. रा. देव यांनीं अनेक वृत्तांत हें चरित्र गायिलें आहे. त्यांच्या काव्यांत प्रसाद हा गुण उत्कटतेनें उमटून दिसतो. तसेंच उपमा, यमक, अनुप्रास, उत्प्रेक्षादि अनेक शब्द व अर्थालंकारांनीं युक्त ही कविता झाली आहे.

वाचें बरवें कवित्व । कवित्वीं रसिकत्व
रसिकत्वीं परतत्व । स्पर्श जैसा ॥

या श्री. ज्ञाने. महाराजांच्या उक्तीप्रमाणें या कवितेची अन्य काव्याप्रमाणें रसिकत्वापर्यंतच धांव न जातां तिचा ब्रम्हनिष्ठ अशा संत चरित्राशीं संबंध घडल्यामुळें ती परतत्व स्पर्शानीं युक्त झाल्यामुळें 'देव-कन्येच्या' पहिल्या भागांतील अपूर्णताही या द्वितीय भागांत राहिली नाहीं. ही कवि जीवनांतील महत्वाची समस्या या निमित्तानें सुटली आहे.

श्री. भटजी बापू महाराज यांची सांप्रदायिक मंडळी मराठवाड्यांत हजारोंनीं आहे. त्यांनीं श्री. देवांच्या या सरस काव्य चरित्रास आपला आश्रय–द्यावा म्हणजे कवीस अशीच रसाळ संत–चरित्रें आपल्या रसाळ काव्यांत लिहिण्याची स्फूर्ति येईल.

पंढरपूर
मिति चैत्र शु॥ १
शके १८७८

घुंडामहाराज देगलूरकर,
पंढरपूर

# निवेदन

'देवकन्या' पुष्प १ लें प्रसिद्ध करून वर्ष दीडवर्ष झालें नाहीं तोंच 'देवकन्या पुष्प २ रे' **श्री. संत भटजी बापू महाराज ऊर्फ श्री. बाळकृष्णानंद स्वामी** यांचें काव्यमयचरित्र रसिकांपुढें ठेवण्याचा सुयोग आला. पहिल्या पुष्पाच्या इतक्या लवकर खप झाला यांत माझी थोरवी नसून रसिकांचा रसिकपणाच दिसून येतो.

मे महिन्यांत हैदराबादेस कांहीं कामानिमित्त गेलों असतां या दुऱ्यास पुष्पाचें चरित्रनायक श्री सद्‌गुरु भटजी बापू महाराज यांच्या पुण्यतिथीस या दासाला कीर्तनसेवा करण्याचा सुयोग आला.

कीर्तन संपल्यावर महाराजांचा शिष्यवर्ग सहज म्हणाला ' महाराजांच्या पुण्यतिथीला महाराजांचेच काव्यमय चरित्र असल्यास तेंच कीर्तन रूपानें तीन दिवसपर्यंत गायिले गेल्यास महाराजांच्या भक्त मंडळीना त्यांचें त्यागमय जीवनाची ओळख होईल. "तरी आपण हें काव्य करण्याचें काम हातीं घेतां कां ? " यावर महाराजांच्या सेवेचें गोड पण अवघड काम करण्याचें मी स्वखुषीनें पत्करलें.

महाराजांनीं दिलेली प्रेरणाच, हें श्री. संत भटजी बापूचें चरित्र (पुष्प २ रें) रसिकांच्या हातीं देण्यास कारणीभूत झालीं 'बोलविता धनी वेगळाची' एवढें सांगितलें म्हणजे पुरें. अशा थोर संतांचें चरित्र लिहिण्याचा योग मला आला हें मी माझें भाग्यच समजतों.

त्यांतल्यात्यांत विशेष हा कीं पूजनीय संत ह. भ. प. श्री. धुंडामहाराज देगलूरकर ( पंढरपूर) यांना विनंति केल्यावरून, त्यांनीं अत्यंत कामाची निकट असून देखील या चरित्रास प्रस्तावना लिहून दिली हें मी माझें सद्‌भाग्यच समजतों.

दुसऱ्याचें अल्प गुणदेखील मेरूपर्वतापेक्षां मोठें आहेत हें जें थोरांचें लक्षण, याला पूजनीय श्री. ह. भ. प. धुंडा महाराज अपवाद नाहींत हें त्यांनीं प्रस्तावनेंत केलेल्या गौरवावरून सहज ध्यानांत येईल. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

त्याचप्रमाणें 'देवकन्या' पुष्प १ लें या माझ्या काव्यसंग्रहावर योग्य, समर्पक असे अभिप्राय देणारे विद्वान रसिक, **प्रा. शं. वा. दांडेकर पुणें, प्रा. शं. दा. पेंडसे नागपूर,** (पंढरपूर साहित्य संमेलनाध्यक्ष) **लोकनायक माधव श्रीहरी अणे, पुणें** ( पक्षवातानें पलंगावरच पडून असतांनाहि ) ' विवेक ' औरंगाबादचे संपादक **श्री. श्री. के. गोळेगांवकर, वा. दा. गोखले,** चिटणीस महाराष्ट्र साहित्य परिषद पुणें, **अेन्. डी. टिळक डे. डायरेक्टर हैदराबाद, न. का. घारपुरे,** प्रा. फर्ग्यूसन कॉलेज एम्. ए. पीएच्. डी. व **श्री. श्रीकृष्ण दामोदर दातार,** मेडिकल अँटी लेप्रसी इन्स्पेक्टर, धाराशिव या सर्वांचें मी मनःपूर्वक आभार मानतों.

चरित्रांतील माहिती पुरवून चरित्र लिहावयास मदत करणारे **प्रा. भुसारी, श्री. बळवंतराव घाटे सर न्यायाधीश हैदराबाद** व महाराजांचा फोटो पाठवून देणारे **श्री. अेस्. अे. पाटील शिक्षक प्रा. डावरे** शाळा हैदराबाद या सर्वांचें मी मनःपूर्वक आभार मानतो.

श्री. बळवंतराव घाटे यांनीं तनमन धनानें मदत करण्याचें आश्वासन दिलें नसतें तर हें गोड काम प्रसिद्ध करणें मला शक्य झालें नसतें. हें मी निश्चित सांगतो. म्हणून **श्री. घाटे यांचा मी ऋणी आहे.** सुंदर छपाई उत्कृष्ट कागद वापरून आत्मीयतेनें योग्य खर्चांत पुस्तक प्रकाशन केलें या बद्दल प्रेसचे मालक राजाराम कृष्णाजी कुलकर्णी यांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतो.

' श्री संत भटजी बापू चरित्र " हें देवकन्येचें २ रें पुष्प रसिकांचें प्रेम संपादन करून उत्तरोत्तर इतर अप्रकाशित प्रकाशनास देवाचे व संताचे आशीर्वाद मिळोत. हीच सदिच्छा प्रकट करून हें निवेदन येथें संपवितो.

देवनिवास
धाराशिव.
चैत्र शु॥ १
शके १८७८

संतपदरज
**श्री. रा. देव**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... विः ...  ........
क्रमांक ..........  नोंः दिः ......... ....

## — पूर्वार्ध —

## श्री. भटजी बापू महाराज हैद्राबाद यांचे

## काव्यमय चरित्र

(११७) द्रा. क्र.

आर्या–१

भटजी कितीक झाले बापू भटजींच अेक [illegible]
ख्यात न कां ? कोणाला गातो म्हणुनीच देव तत्गीत

भु. प्र.–२

प्रांतीं वऱ्हाडांत जिल्हा अकोला
तयामाजि पातूरि जो पूज्य झाला
जया वंदिती लोक अत्यादरानें
नमस्कार रामा तुला दो करानें

दिंडी–३

गार्ग्य गोत्रीं देशस्थ विप्र नांदे
म्हणति ज्याते श्री. रामचंद्र मोदें
वेदशास्त्रीं संपन्न असे जो कां
ख्यातधर्मी अत्यंत होय जो कां

ओवी–४

आवडी ज्याची धर्मावरी
म्हणूनि म्हणती धर्माधिकारी
कांता बकुळा शोभे घरीं
पतिव्रता जाणा

आर्या–५

ऐक्य स्त्री पुरुषाचें तेथें संतुष्ट हो रमाकांत
लक्ष्मीसहित वसे तो परमात्मा त्याच ठायिं हो सतत

ओवी–६

बकुळा बाईच्या उदरीं
पुत्र जन्मला भाग्यशाली
गदाधर नामें सत्कुलीं
जाहला ख्यात

द्रु. वि.–७

रुक्मिणी म्हणुनिया द्विजकन्या
लाभली पतिरता बहुधन्या
लक्ष्मणा जनन दे सुत आधीं
रामचंद्र दुसरा हरि आधी

पद–८

वाढुं लागले धर्माचरणीं उभय बंधु बंधू
वेदशास्त्रि ते निपूण झालें यांत नसें किंतू
दुर्दैवें परि आश्रय तुटला मातापितरांचा
प्रपंच मोठा गळ्यांत पडला लक्ष्मणभाऊंच्या
अन्नावांचुनि प्राणहि जातां सत्य न तो सोडी
सुरी गळ्यावर कुणी ठेवितां असत्य ना जोडी
विद्याधन तें होतें त्यांना, भ्रांत दुपारीची
सरस्वती हो प्रसन्न, त्यांना वाण पडे श्रीची
काय करावें कांहि सुचेना भाऊतें नित्य
भीक मागतां लाजिरवाणें जिणें होय सत्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ....................(११) वि: ....................
क्रमांक                नों. दि. ....................

अंकामागुन दिवस चालले अर्धपोटि त्याचें
प्रपंच मोठा काय करावे शल्य मना बोचें.

ओवी–९

ग्राम सोडून आपलें । अन्यग्रामींच जाणें भलें
निश्चित मनीं ठरविलें । लक्ष्मणभाऊनें

आर्या–१०

मंगल मुहुर्त पाहुनि, निरुपायें भाउ सोडि हो सदना
वदना मी दाउ कुणा मनिं बोले रुक्मिणी रमणा !

भु. प्र.–११

अकोल्यांत आले तदा भाउराय
कशाला तुम्ही पातला हेतु काय ?
कुचेष्टा खलांनी किती चालवीली
म्हणे काय लज्जा तुम्ही घालवीली

ओवी–१२

सज्जन बघतां भाऊप्रती
आनंद झाला तयाप्रती
शास्त्रनिपुणा ब्राह्मणाप्रती
पाहूनिया हर्षती

भु. प्र.–१३

म्हणे थोर गांवांत मोकासदार
रहावें तिथें जाउनीया सदार
तनानें, मनानें, धनानें उदार
तयावीण नाहीं दुजा संत थोर

दिंडी–१४

द्विजश्रेष्ठा पाहूनि आदरीलें
श्रेष्ठ जागीं भाऊस बैसवीलें.
चरण वंदुनि भाऊस थोर बोले
कसे विप्रा ! चरण हें इथें आले ?

आर्या–१५

पातूर ग्रामीचा रहिवासी विप्रभाउ मज म्हणती
ग्रस्त प्रपंच भारें निर्द्रव्या तुच्छ तुच्छ जन गणती

पद–१६

श्रीमंत मनीं गहिंवरला । विप्रास बोल हें वदला
आलस्यि माय गंगाही । मत्गृहीं शकुन शुभ झाला
येताच संत सदनाला । होय तो दिवाळी दसरा
वास्तव्य मत्गृहीं करणें । निःशंक विनति चरणाला

भोग कां चुके कोणाला ?
थोर वा सान पुरुषाला
शांतवी भाउ हृदयाला

वास्तव्य मत्गृहीं करणें । निःशंक विनति चरणाला

ओवी–१७

दैवगती ती विचित्र
शास्त्रकुशल तो निपुण
श्रीमंताचा घरी आश्रय
पुजारी होउनिया

आर्या–१८

द्वादशि भोजन घाली विप्राते नित्यकाल श्रीमंत
अंतर यांत न केव्हां आले संकट जरीहि बलवंत

ओवी–१९

स्वपुत्र आणि लक्ष्मण
श्रीमंत मानी समान
अंतकालीं बोलें वचन
सादर तें परिसावें

पद–२०

संपत्ती मम अर्ध तयाचा भाग देइ विप्रा–
भाऊराया समान तुझिया हेंच जाण पुत्रा
सुपुत्र बोले पुरविन अपुली होय मनीषा जी
जें जें आपण वदाल त्यांतचि मीहि असे राजी
उदरिं जन्मुनी वचन पित्याचें पुत्र न जरि पाळी
व्यर्थ शिणविली माय तयानें जन्मुनि थोर कुलीं
धन्य जाहला रामचंद्र जो जनक वच न मोडी
चौदा वर्षें विजनिं काढिली परि न वचन मोडी
पुंडलिकानें पितर पूजिलें धन्य देव झाला
सत्पुत्राची आज्ञा होता विटीं उभा ठेला

ओवी–२१

श्रीमंताच्या पश्चात्, सत्पुत्र बोले भाऊप्रत
पित्राज्ञा झाली मजप्रत, अर्धभाग तो द्यावया

पद–मालकंस–२२

गहिंवरला द्विज अंतःकरणी
दैवा तव ही कसली करणी

टपटप गळती अश्रू नयनीं
गहिंवरला द्विज अंत:करणी
अन्नावर ज्या पुष्ट जाहलो
अर्धभाग तत् घेऊं हिरुनी
जातो येतो अन्न न सेवीं
बाळा ! सांगे ध्यानीं ठेवी
अन्नदान जें व्रत जनकाचें
चालू ठेवी विनती चरणीं
आल्या अतिथा परत न लावी
मीठ भाकरी त्यासी द्यावी
उच्च नीचता मनिं न गणावी
देव वसे तो सर्व ठिकाणीं
धन्य द्विजाचें अंत:करण
गजांत लक्ष्मी लाथें त्यजुनी
भरतासम जो वागे निर्मल
कोण द्विजाते अशा न मानी ?
निरोप घेई मग सर्वांचा
भाऊराया निर्मल मनिंचा
हळहळले जन वियोग होता
धन्य बोलती अंत:करणीं.

ओवी-२३

लक्ष्मण भाऊनें सोडिले सदन
अकोला आपुले वसतिस्थान
नित्य भाऊते आठवून
धन्यता देती तयातें

दिंडी–२४

भाउराया तेथून तो निघाला
भाग्यनगरीं तत्काल तदा आला
मित्र त्याचा परिचीत सोनुपंत
वास केला नि:शंक तत्गृहांत

आर्या–२५

करभार पंत पाही राजारायान थोर पुरुषाचा
साचा प्रसिद्ध जो कां कर्तृत्वानेंच भाग्यनगरीचा

मंदारमाला–२६

म्हणे भाउ ! नि:शंक येथें रहावें
तुम्हां योग्य उद्यान हें आमुचें
करा स्नान संध्या जपादीक कर्में
तशीं पुण्यकर्में तुम्हां जी रुचें
किती भाग्य वर्णू पवित्र स्थलाचें
समाधी जिथें नायकाची दिसे
फिटे दैन्य दारिद्र्य अैशा स्थलाचें
जिथें संत बापू सदा हे वसे.

आर्या–२७

वास तिथें करि भाउ, सात्विक मनुजा न कोण दे मान ?
यशवंत अरब असलें कितीक येऊनि तुकविती मान

अशा रीतीनें भाऊचा मान वाढूं लागला. रोज हजारों पात्रांचें अन्नदान होऊं लागलें. श्राद्धाचें भोजन म्हणजे जणू एक लग्न सोहळा. ब्राह्मण व ब्राह्मणेतरासही १ रु. दक्षिणा मिळत असे. पण गांवांत कांहीं कुटिल लोक असतात. त्यांनीं निंदा करावयाला सुरुवात केली. दुर्जनाला सर्व विपरीत दिसतें. परमेश्वर देऊं लागल्यावर कोठूनही मदत होतेच.

परमेश्वर प्रत्यक्ष कोषाधिकारी असतां भाऊंना काय कमी पडणार? श्रावण मासांत सप्ताहाकरितां ५०० रु. भाऊंना हवें होतें. त्यांनीं पंतास गोष्ट काढली. पंतानें थट्टेंत म्हटलें काय नेहमीं हुंडी येथेंच पडतें? दुसरें ठिकाण नाहीं काय? त्यावर भाऊ म्हणाले, "खरी हुंडी कोठेंही पटते. असें म्हणतांच पंत म्हणाले, "तर मग जा–पुराणमल्लाकडून पैसे घेऊन या. तरच मी तुम्हाला खरें समजेन व तुमची पाठ थोपटीन" त्यावर पंत बोलले ५०० काय ?

लक्ष्मणभाऊ :– चामर–२८

पंच शतक पंत तुम्ही काय मजसि सांगतां
असंख्यही वदा मला करिन तदिय पूर्तता
देव देइ साथ ज्यास कधीं पडेल कां उणें ?
आणणार मी न जरी धिक् मदिय हे जिणें.

भाऊ तेथून पुरणमल्लाकडे गेले. पण पुरणमल्लाच्या घरीं वेगळाच प्रकार. त्यांची सीतारामाची मूर्ती एकाएकीं हरवली. ते चिंतेंत होते. इतक्यांत भाऊ समोर आले. सर्व प्रकार भाऊस सांगितला तो असा–

पुरणमल:– भी. प. २९

माझी । दैवगती फिरली
मद्दैवत जो सीताराम
टाकुनि गेले नच आराम
केव्हां पडली कोठें गेली
कळे न मजला दैवी करणी

पुरणमल:– आर्या ३०

मूर्ति मला कुणि देतां देईन इच्छित तयास मी दान
दानत सर्वा ठावे प्रसन्न होतांच अर्पि मी प्राण

भाऊ म्हणाले घाबरूं नका. मूर्ति मिळेल. पण वचनभंग मात्र करूं नका. इतक्यांत काय चमत्कार झाला !

ओवी–३१

धावुनि आला तेव्हां पुजारी
मूर्ती सांपडली रावणारी
शालिग्रामाच्या पुसता खालीं
सीताराम मूर्ति मज दिसे

पुरणल्लाला आनंदाश्रू आले व म्हणाला–

चामर-३२

धन्य भाऊ तूं जगांत मूर्तिमंत देवता
पाय हे तुझे मला शकुन पूर्ण तत्त्वत:
राममूर्ति ना दुजी तूंच गमसि राम रे !
प्रसन्न मी तुला द्विजा तुजसि सर्व अर्पिले

लक्ष्मणभाऊ :– पृथ्वी–३३

असे गरिब विप्र मी स्थळ न द्रव्य ठेवावया
रमापति मला पुरे मज नको उपाधी वया
परी पुरणमल्ल तो सकल या धना घ्या वदे
त्यजी, न इथुनी पुढें मुळिच मी तुझी सत्पदें

लक्ष्मणभाऊ :– ओवी–३४

साठ सहस्त्र रुपये आतां
नेऊनि द्यावे सोनोपंता
माझे नांवें जमे करितां
नेऊनि द्यावें सत्वर

लक्ष्मणभाऊ :– आर्या–३५

देउनि साठ सहस्त्रें बाकीचा हा प्रसाद घे माझा
मान्य करी विनती ही बोले भाऊ मनांत जो साचा

दिंडी–३६

द्रव्य द्यावे मोजून पंत वेगें
पावती ती द्यावीच मुनिम सांगे
जमा करणें नांवेंच लक्ष्मणाच्या
पुरणमल्लाची हीच असे वांछा

हें पाहतांच पंतांना आश्चर्य वाटलें व आपण अशा थोर व्यक्तीची परीक्षा पाहण्याचा मूर्खपणा केला याचें वाईट वाटलें.

दिंडी–३७

स्तुती निंदा भाऊस समसमान
कुणी देवो सज्जना मान, वा, न
मरण येवो आज वा कधीं काळीं
सुमार्गा ना टाकिती कठिण वेळीं

# - उत्तरार्ध -

## ( चरित्र–नायक श्री. भटजी बापूंचा जन्म व कार्य )

भु. प्र. ३८

कुणाची असो ती तनू होय भंग
यशोदेह राहे सदा तो अभंग
महाराज बापू अशा भाग्यवंता
नमस्कार माझा अशा थोर संता

दिंडी–३९

लक्ष्मणाचा जो अनुज रामचंद्र
थोर शोभे महाराज ज्यास पुत्र
जननि सीता होतीच शीलखाणी
पितर होते बापूस रत्नखाणी

रामचंद्रपंत मात्र :- आर्या–४०

व्यवहारांत न खोटा, शीला पुढतीच तुच्छ ज्या मरण
कुजनाते सज्जनांना दिसती सिद्धांत यांत अंतर न

लावणी–४१

कुणि म्हणे राम हा पिसा, वागतो कसा
सान तो कसा कुजन जन बोले
दशग्रंथि कसा हा । आश्चर्य वाटते भले
वाढिले अन्न जे पात्रीं । खाय हा
जीर्ण तें वसन हा नेसे । नित्य हा
ताळ ना तंत्र मुळि राहे । या पहा

या परी, दुष्ट बोलती। नित्य निंदिती। रामचंद्राला
खंती न तयाची मुळिंच रामचंद्राला

दिंडी–४२

शके सतराशें साठ वरी सात
वद्यपक्षीं श्रावणीं जन्म घेत
ख्यात नामे जो पुढें त्रिलोकांत
बापुभटजी म्हणतात जया संत

शा. वि.–४३

झाला तैं व्रतबंध योग्य समयीं थाटांतही बापुचा
विद्याभ्यास करावया गुरु मिळे बालंभट ख्यात हा
पातूरी मग ब्रह्मकर्म शिकले दामोदरापासुनी
आलें भाग्यपुरीं फिरूनि भटजी पितृव्य सत्सेवनीं

ओवी–४४

उभयतां करिती अन्नदान
कालक्रमणा होतसे छान
शके १७७७ होतां पूर्ण
देह ठेविला भाऊनें

आर्या–४५

कीर्ती दिगंत करुनी नश्वर देहास ठेवि हा भाऊ
भाऊ हा सत्य, जसा रामाचा अनुज जो दुजाभाऊ

ओवी–४६

लक्ष्मण भाऊची मृत्युवार्ता
गांवांत पसरे हां हां म्हणतां
रीघ लागली दर्शनाकरितां
म्हणती झाला अंधार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम (२१) वि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

आर्या–४७

गेले निघून भाऊ, सुचे न कांहींच रामचंद्रास
साध्वी ती सीताही, बोले आम्हांस कोण दे ग्रास ?

सीताबाई :– गज्जल (कसा करी छल) ४८

कसा करावा प्रपंच आतां
भाउराय हा सोडुनि गेला
व्रत हे आतां कोण चालवी
पति तो माझा भोळा भाळा
बापू माझा दशवर्षांचा
हाकिल कैसा प्रपंच गाडा
भोग कुणाला कधीं न टळती
भाललिखित ते टळू शकेना
मोल मजूरी करून पुढती
चालवि साध्वी प्रपंच अपुला
आल्या अतिथा मुठभर द्याया
चुकली नाहीं साध्वी केव्हां

ओवी–४९

दोन वर्षे लोटली ऐशापरी
रामचंद्र बोले वैखरी
अनुज्ञा द्यावी मजला साध्वी
संन्यास दीक्षा घ्यावया

मंदाक्रान्ता–५०

घेई दीक्षा सतिस पुसुनि थोर तो रामचंद्र
रामानंद प्रथित म्हणुनी जाहला सौख्यचंद्र

मराठी ग्रंथ संग्रहालय (८११)

गेले तेह्नी त्यजुनि जगतां वर्ष ते दोन जाता
उद्यानी ज्या वदति ललिता स्थान ते आज आता

मंदाक्रान्ता–५१

कंठीं सीता दिवस असले चिंतनीं ईश्वराच्या
बोले आतां उबग मजला सत्य आला जिवाचा
पाही तेव्हां विहिर सति ती आत्महत्या कराया
भेटे तेव्हां सहजचि तिला एक साधू स्थलीं त्या

पृथ्वी–५२

घटव्दय करीं धरी सुजन, धान्य, नी जीवन
तिथेच लय पावला त्यजुनि तो जगज्जीवन
असें तिजसि भासलें क्षणभरी तदा तंद्रित
समाधि मग भंगता सुख मिळे तिला शाश्वत

पद–५३

नित्य आठवी । राम । सतीती
योगक्षेमचि पशुपक्षांचा
चालवि प्रभुविण कोण
प्राणघात हा व्यर्थचि करितां
रुष्ट होय तो राम

आर्या–५४

दृष्टांताचा तेव्हां आला प्रत्यय सतीस तत्काळ
अरब वदा पाचारी बोले 'येथेंच कंठणे काळ'

ओवी–५५

अरब यशवंत बोले वचन
मातेसह रहावें येउन
करावें भागवत पारायण । नित्य नियमानें आपण

पृथ्वी–५६

पुराण तंव चालता सकल वृंद ते डोलती
म्हणे खचित व्यास हा नच दुजा गमे संप्रती
लहान असुनी किती कथन गोड हें लागते
प्रभूविण निराश्रितां पुरवि लाड हो कोणते ?

आर्या–५७

कालक्रमणा करितां संगीताची कला तदा शिकला
जो जो पटुसंगीती त्या त्या पासून घेइ भाऊ कला

कटाव–५८

केले गुरु मग काशीनाथा । ज्ञानकलेचा विद्यादाता
पाध्यें म्हणती ज्यासहि जनता । ग्वाल्हेरीचा बुवा प्रसिद्ध
गोविंदाते गुरु करीत । तिसरा गुरु जो ख्यात जगांत
विठ्ठल आण्णा म्हणती ज्यास । रोजेकर तो चतुर्थ गायक
बापू होई त्याचा सेवक। दाजीबा तो पंचम मोठा
ज्ञानसागरीं पूर्णचि होता । मनीराम तो तसा सहावा
लक्ष्मणवासी नित्य भजावा । ख्याल टप्पा शिकवुं लागला
समाधान ते महाराजाला। गायन अैकतां महाराजांचें
उचंबळे तें चित्त गुरुचें । बोले मनि जरि यास शिकविता
धन्य धन्य मी होइन आतां । अशा प्रकारें ।।
समस्त गुरुचा प्रसाद होता । बापुस येई गान निपुणता
ठायीं ठायीं गान बापुचें । नित्य नित्य ते होई साचे
नरेंद्रबहादुर भाग्यनगरिचें । गायन शास्त्रीं अती कुशल नें
पाचारीती महाराजाते । गायन कर्णीं पडतां डोले
गंधर्वचि हा दुजाच बोले । प्रधान तेव्हां भाग्यनगरिचा

मधुरगायनीं महाराजाचा । लौकिक गेला कर्णीं त्याच्या
गोद्विज पालक प्रधान साचा । दत्तमंदिरीं उत्सव साचा
दरवर्षि हो आनंदाचा । असंख्य गायक येती गाती
बाप आले उत्सवप्रांती । महाराजांची गान मधुरता
ऐकुनि तोषें प्रधान चित्ता । मुष्टि भरोनी दिधल्या मोहरा
बापू पडले तसेच बाहेर । भृत्य धावले तसेच सत्वर
दिधल्या मोहरा वाटुनि त्यांनीं । कपर्दीक ना ठेविली त्यांनीं
मनीं भाव कीं सर्वाठायीं । प्रभू वसे तो शंका नाहीं
यापरि सारे स्तवूं लागले । भाग्यनगर ते धन्य जहाले
अैशा संता । मानिते सकलही जनता

आर्या–५९

अैकुनि सत्पुत्राची कीर्ती, संतुष्ट माय सति होई
करणें विवाह आतां विनवी मनि माय रूक्मिणीबाई

दिंडी–६०

वसे कंधारीं ख्यात जगीं बाबा
जया होते उपनांव थोर अय्या
त्यास कन्या सावित्री एक होती
अर्पि बाबा बापूस मुदित चित्ती

आर्या–६१

सासूचें मन ओढी सावित्री ती सुशील आचरणें
चरणें ती वडिलांची धरितां जगिं, माजतील काय रणें ?

ओवी–६२

सासू सुनेचे ऐसें वर्तन
घडतां होईल काय भांडण ?

माता पुत्रीं ज्यापरी जाण
वर्तती त्या उभयतां

आर्या–६३

जाया अनकूल असे, किंवा जनका तसाच सत्पुत्र
धन्य प्रपंच त्यांचा देवहि जोडील हो तिथें हस्त

शा. वि.–६४

जेथे शांति वसे, पतीरत जिथें कांता सदा राहते
कार्यें तुष्ट करी सुपुत्र जनका मातेस तेवी मुदें
संतोषा धन मानिती विपदिहीं सत्या न जे सोडिती
संपत्तीही विपत्ति ज्या समसमा धन्यो गृहस्थाश्रमा

शा. वि.–६५

भार्या रुष्ट सदा, पतीस गणते, जी तुच्छ कार्यीं सदा
जेथें पुत्र गणीं तृणासम पिता माताहि निंदी सदा
लोभा मान जिथें, असत्य म्हणजे, ही आमुची संपदा
ऐश्वर्यें इतरांस तुच्छ गणिती धिक् धिक् गृहस्थाश्रमा

भु. प्र. ६६

गृहस्थाश्रमी वागती योग्य दोघे
बघूनी तया वंदिती लोक मोदें
सदा अन्न देती गरीबास भावें
नमस्कार दोघा सदा नम्र भावे

मं. माला–६७

संसार थाटे असा चालला हा
महाराज कांता सुखें राहती
आतिथ्य नेमें सदा योग्य चाले
घडेना मुळीं खंडना त्यांतही

दुर्दैव योगें परो माय जोडी
वृद्धत्व येतां परंधामते
झाले महाराज कष्टी म्हणाले
प्रभूवीण तारी मला कोण ते ?

आर्या–६८

षट्पुत्र दोन कन्या पडली भरती प्रपंचि बापूच्या
परि कन्या दोन तसा तनयचि राहे गृहांत साधूच्या

ओवी–६९, ७०, ७१

गोपीनाथ दादा म्हणुनी । कीं जणूं रत्नाची खणी
दोन कन्या त्या सद्गुणी । आधार होता बापूंचा
नागूबाई कन्या थोर । शंकरा अर्पी पाहून
केले थाटांत हो लग्न । महाराजांनी
योग्यकाली नागूबाई । सत्पुत्रास जनन देई
राम म्हणती सर्व त्यासी । अतीव भाग्याचा

आर्या–७२

झाले शिक्षण दैवे लागे तत्काळ नौकरी रामा
माता पुत्र उभयतां अकालि गेले निघून निजधामा

ओवी–७३

रामूबाई कन्या दुसरी । लग्न होता वैधव्यसागरीं
कर्मगती ती गहन खरी । चुकेल ना कवणाते

कामदा–७४

एक भुक्त ती राहुनी सदा
साह्य बापुना करितसे मुदा
नित्य सेविती श्रीहरी पदा
लोळते जिथे मुक्ति संपदा

दिंडी–७५

द्वादशीचा पाहून दिवस थोर
  निधन पावे कन्याच दुजी थोर
संकटाची लागली माळ घोर
  बापु, निश्चल, सोडी न मुळीं धीर

काही दिवसांनीं महाराजांचा एकुलता राहिलेला मुलगा गोपीनाथ याला एक मुलगी चालून आली व गोपीनाथदादाचें अनुसयेशीं लग्न झाले. एकदां गांवांत प्लेग सुरू झाला. त्यावेळीं रघुनाथ पंडिताचे दररोज पुराण चाले. ते आजारी पडले. त्यांनीं अनुसयाबाईस एक कामगिरी सांगितली. मी जेथें राहतो त्या मंदिरांत एका खोलींत माझे पैसे व कांहीं दागिनें आहेत. ते तुम्ही आणावे. ते एका पेटींत ठेवले आहेत.

ती जागा अतीव अंधाराची. पण अनुसूयेनें धाडस करून ती पेटी आणली. पण त्यापूर्वींच पंडितांचा अंत झाला. पण ही सोन्याची संधी आली असतां अनुसूयेनें ती पेटी त्यांच्या मुलांना बोलावून देऊन टाकली.

दिंडी–७६

द्रव्य इतराचें, साधूस मृत्तिका ती
  लोभ मुळिंना जाहला तिच्या चित्तीं
स्त्रिया असल्या होतात वंद्य लोकीं
  धन्य त्यांचा नरजन्म हा त्रिलोकी

शिखरिणी–७७

तदा गोपीनाथा कुणिच नव्हती संतति मुळीं
  म्हणूनी बापूची सहज तुटली वंशज मुळी
परी ना बापूच्या तिळभरि मनीं खंत दिसली
  सुखी वा दुःखीही समचि असती थोरहि कुळीं

गोपिनाथ वारले तेव्हां :- लावणी-७८

जन्म घे, प्राणि जो जगीं । मानवा तया
मृत्यु न कधि टळला
कां दुःख करावे त्या ऽऽचे । समजते न हे मजला-१
यापरी बापू बोलले । सौख्य दुःख ते एक समजती
प्रत्यक्ष पोटचें लाल तदिय ही पडती---२
धन्य हो खचित संसारि । बापु ते
मानिती लोक त्या भावे । बापु ते
वंदिती देवही प्रेमे । बापु ते
भाग्य ते भाग्यनगरिचें । जिथे संत ते बापुसम झाले ।
धन्यत्व पावुनी अमर होउनी गेले ॥

इतके अधिकारी खरें पण सग्दुरुवांचून सर्व व्यर्थ.

आर्या-७९

नामस्मरणें ज्यांच्या कीर्तनिं गोऱ्यास हातही फुटले
तो नामदेव कच्चा गुरुविण, गोरादि वचन हे वदले

आर्या-८०

खेचर पदिं लीन यदा झाला तो नामदेव औंढ्यात
ध्वांत लया ते पावे सग्दुरु करिताच एक निमिषांत

ओवी-८१, ८२

म्हणूनि महाराज बोलती । गुरुवीण ना सद्गती
मिळे न कोणा कल्पांती । हें सत्य
रामानंद तो म्हैशाचा । सद्गुरु केला तो साचा
अनुग्रह घेती तयाचा । मुक्तिसाठीं

**प्रसंग १:-** आर्या-८३

गोकर्ण क्षेत्रीचा ब्राह्मण येऊनि राहिला पाशी
वर्षत्रय घालविले लोभाच्या परि गुंतला महापाशी

गोपीनाथ दादांचा पगार आला होता. तो त्यांनी कोटांत ठेवला व भोजनास उठले. इकडे त्या ब्राह्मणानें पैसे पळविले. महाराजांना हें कळलें.

भु. प्र.-८४

त्या ब्राह्मणानें जरि वित्त नेले
खंती न त्याची महाराज बोले
परि विप्र सोडून आम्हांस गेला
हें शल्य टोचेच माझ्या मनाला

पद-८५

काळ कंठिती अशा प्रकारे बापू महाराज
चोरसावही समान गणिती धन्य महाराज
जें जें येती दारी त्यांना अन्नदान देती
भेदाभेद न कधीं मानिला तयानीच चित्तीं
कितीक घेती महाराजांचा गुरुमंत्र भावें
आपण तरती दुजा तारिती ईशभक्ति भावे
आषाढांतचि भाद्रपदींही करिती सप्ताह
भागवत पोथ्या द्विजा अर्पिती करुनी सत्कार
नंदलालजी राम प्रतापहि पुरविति सामान
चोख परी त्या पैसे देती हिशोब दावून
स्त्रिया बोलती उपदेशावें महाराज ! आम्हां
पतिसेवा ती सदा करावी मंत्र हाच घ्यावा
नाम हरीचें नंतर घ्यावे तारी जें सकला
अन्नदान ते नित्य करावें बोध हाच सकला

आतां महाराजांची मित्रमंडळी पहा-

कटाव–८६

महाराजांची मित्र संपदा । हरील अमुची सर्व आपदा
लोळण ज्यांच्या पदीं संपदा । रंगनाथ ते स्वामी थोर
दाजी गुरु ते दुजे विप्रवर । बाळकृष्ण तो थोर महंत
बाळाभाऊ जगिं विख्यात । गोविंदबाबा बेदरवासी
प्रसन्न संतत ईश्वर ज्यासी । नारायण ते भाग्य पुरीचें
मल्लप्पाही औसापुरचें । महाराजाना पूज्य लेखिती
नागोबा ती प्रसिद्धमूर्ती । सांगु किती मी तदीय कीर्ति
महाराजांची मित्र मंडळी । मानित होती महाराजा ती
काय थोरवी वर्णावी ती ।।

भाग्य तयाचें । वर्णवेल देवा कैंचे ?

दिंडी–८७

कधी चुकली वारी न पंढरीची
द्वादशी ती चुकली न कधी त्यांची
वयोमानें वृद्धत्व तयां आले
कर्ममार्गी वृद्धत्व लया गेलें

मं. माला–८८

तीर्थाटनें ती घडे सर्व त्यांना
पदीं चालतां पुण्य तें लागते
नेती सवे ते अनाथा जनाते
तया द्रव्य देतीच जें लागतें
जे द्रव्य त्यांना मिळे गायनींही
गरीबास देती यथाकाल ते

विवाहीं पडे ज्या कधीं वाण कोणा
सदा साधिती हो परःकार्य ते

ओवी–८९-

अधिक मास येता जाण
सप्ताह करिती पुण्यपावन
चाटिती अन्न ते समसमान ॥ भेदाभेद न मानतां

दिंडी–९०

कुणी करितां भेद ना पटे त्यांना
द्वैत चित्ती ठेवणें आवडे ना
सर्व ठायीं भरलाच एक ईश
भेद कोठे राहे न इथें लेश

ओवी–९१

अन्नदान चालता नित्य
तृप्त होती सकल अत्यंत
दुर्जना न पाहवे कृत्य । सज्जनाचें

पद–लावणी ९२

कुणि म्हणें करी हा ढोंग पहा साधुचे
लोकास नडवुनी देई काय हें अन्न पदरिचें
लोक ते भाळुनी । नित्य देति द्रव्यास
काय हा फुकट कीर्तीचा बापूस व्यर्थ हव्यास
यापरी नित्य निंदिती कुजन बापूस
खंती न मुळींहो वाटे त्याची ही जरा संतास

केव्हांही त्यांची समवृत्ति कायमच. जेव्हां गोपीनाथदादा वारले तेव्हां ते म्हणाले :–

**समवृत्तीचीं उदाहरणें :-** आर्या-९३

जो घेई जन्म जगीं मृत्यु तो पावतो नवल काय ?
काया नश्वर असतां व्यर्थ म्हणावे कशास हो हाय

इतक्यांत कांहीं बाहेरगांवची मंडळी आली व महाराजांना म्हणाली, "आम्हीं लांबून आपले गाणें ऐकावयास आलों आहोंत. तरी कृपा करून गाणें ऐकवावें." त्यांना हें घरचें प्रकरण माहीतच नाहीं. घरांत दादांचे प्रेत पडलें आहेत. लोक तयारीसाठीं आले आहेत. पण महाराज शांतिसागर. यांनीं १ तासभर मधुर गायन ऐकविलें.

मं. माला-९४

देहांत झाला सुताचा गृही हो
पडे देह सारे रडूं लागले
आप्तेष्ट सारे स्मशान क्रियाची
करायास तेथें जमूं लागले
आली तदा मंडळी कोणि तेथे
विनंती करी बापुते गावया
बापू तया एकवी गोड गाणें
अशा याच गंभीर वेळीं तदा

त्या पाहुण्यांना नंतर हें मुलाच्या मरणाचें वृत्त कळलें. त्यांना पश्चात्ताप झाला व ते महाराजांना म्हणाले-

पृथ्वी-९५

क्षमस्व गुरुजी आम्हां, मुळि न वृत्त हें ठाउक
अनंत अपराधि हो खचित तूं जगन्नायक
असें कितिक दाखलें अमित जे तया ना मिती
अशा विमल मूर्तिला सकल देवही वंदिती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम (३३) ........... वि: ...........
क्रमांक ........... नों: दि: ...........

प्रसंग ३ रा :- पद–९६

पार्थिव पूजा करीत असतां बापू, इतक्यांत
धांवत आले कितीक जन, ते करिती आकांत
'म्हणती बापू, पत्नी तुमची पडली कूपांत
चला चलाहो काढूं तिजला पाहुं नका अंत'
बापू परि ते पार्थिव पूजा सोडुनि ना उठले
यथासांग ती पूजा झाली नवल पहा घडलें
पुनरपि आले जन ते वदले क्षेम असे जाया
'बरे जहाले पूजन वेळा गेली ना वाया'
बापु बोलती छान जाहलें लाभद्वय झाला
पत्नी लाभे जिवंत, आले विघ्न न पूजेला

निस्पृहता, प्रसंग ४ था :- ओवी–९७, ९८

अनाथ कोणी मृत होता । द्रव्य देती अंत्यविधीकरितां
अस्थी नेउनी टाकिती स्वत: । भागीरथीं माजी
चांदींची आणितां उपकरणें । महाराज देती परतोनी
म्हणे कासया मजलागोनी । माणिक प्रभूसी अर्पा ना

आर्या–९९

अर्पी महाराजांना कोणी येऊन आपली बाग
यागकरी मी द्विज बा । अर्पण इतरा करी महाभाग

पद–१००

माणिक अर्पी महाराजांना चार शतक मोहरा
अर्पण केल्या मनाबाइच्या त्यांनीं जनकाला

ओवी–१०१

मनाबाईच्या लग्नांत । जनक खर्ची कार्यांत
मोहरा दान केल्या त्वरित । जावयासी

**प्राणिमात्राविषयीं दयादाक्षिण्याचा प्रसंग ५ वा :-**

पद-१०२

अेके दिवशीं भटजी बापू चार कमानीला । पुलावरुनी जातचि असता पाहति अनाथांना । पाय पांगळे हात लुळे ते दृष्टि न नयनांना । उन्हांत तापत बसले होते भोगित दैन्याला । महारोगानें गलित जाहलीं कितिकांचीं गात्रें । दिसती त्यांच्या अंगावरती विदीर्ण ही वस्त्रें ॥ पोट खपाटी पाठिस लागे अन्नाविण त्यांचे ॥ त्राण मुळीं ना उरला त्यांना हाल शरीराचें किती इतरही अैश्वर्याचा तोरा मिरवाया ॥ घोडा गाडी मोटारींतुनी दिसलें त्या ठाया ॥ किती चिरडुनी गाडीखालीं देवाघरिं जाती । खंत परी ना श्रीमंतांना कधीं वाटते ती । प्रासादाचे मालक होते कितीक त्या मधले । अन्न खाउनी माजचि आला कनकेश्वर्यानें ॥ लाडु करंजा पक्वान्नावर नित्य उठे झोड ॥ अजीर्ण झालें कित्ये-कांना खाउनिही गोड ॥

पक्वान्नाचा पाउस पडला खाउनि रस्त्याशीं
इथें मिळेना खाया भाकर, राहति उपवासी

× × ×

दृश्य असें हे बघतां द्रवला आत्मा बापूंचा
टपटप नयनीं वाहुं लागला पाटचि अश्रूंचा

× × ×

मिठाई कोणी तों भक्तीनें बापूते दिधली
पुलावरी त्या सत्प्रेमाच्या भक्तिजलें भिजली
वांटुनि दिधली मिठाइ सारी भटजी बापूंनीं
भिकाऱ्यांस त्या, ठेविलि मुळि ना अल्प स्वतः त्यांनीं

× × ×

आश्रय दिधला भरभर अपुल्या मुखीं मिठाईला
कित्येकांनीं, सांगणेंच कां ? अैशा समयाला
तप्तलोहीं त्या बिंदु जलाचें क्षणभरि कां राहती ?
जठराग्नी हा प्रदीप्त होतां काष्ट भस्म होती ?

× × ×

परंतु त्यांतुनि अेक भिकारी मिठाई हस्तांत–
तशीच ठेवी, पाहुनि बापू पडे विचारांत
बाबा ! कां तू ग्रहण न करिसी अपुला हा भाग
काय कशाची चिंता वाटे सांग महाभाग !
उपवास न कां घडती तुजला, नित्य मला सांग
किंवा प्रकृति बरी तुझी ना, दुखते कां अंग ?
चेपूं थोडे काय तुझें मी थोडेसें अंग ?
सेवा घडुं दे मला तुझी वा ! कथा तुझी सांग
भटजी बापू असें बोलुनी चेपिति अंगास
धन्य धन्य तो अनाथ झाला, संता हो हर्ष
देव दयाघन कळवळला त्या पाहुनि दृश्याला
प्रेमजलाचा पाउस पडला अैशा समयाला
उन्हांत घामागर्द जाहले भिकारि बापूही
शांत कराया दयार्द्रवृष्टी केली देवेही

× × ×

बोले तेव्हां दीन वदन तो अनाथ बापूस
स्पर्श करोनी, विटाळतां कां पवित्र देहास ?
बामण तुम्ही, महार आहे, स्वामी जन्माचा
नका नका हे पापचि पदरीं, स्पर्श मदिय तनुचा
काय कथूं मी तुम्हांस संता दैन्य मदिय घरचें

उपाशि मरती सुत दारादिक कितीक दिवसाचें
कुटुंब माझे अेक न केवळ, भोगिती हें हाल
असंख्य असलीं महार पोरें करिती आकांत
अस्पृश्यांच्या उद्धाराच्या मारिति बाता कितिक
सर्व बोलके कृती परी ना दिसते मज अेक
घशांत जाईल कशी मिठाई, जी तुम्ही दिधली
तगु राखु कां ही अेकाकी, होता कुळि होळी

× × ×

महाराजांना कळले सारे उठले ते तडक
पांच मणहि मग मिठाई बापूनें त्वरित
अर्पण केली मिठाई, वदले बापूजी दीना
न्यावी सारी वांटुनि द्यावी तुझ्या बांधवांना
आनंदाश्रू आलें नयनीं हृदयीं बापूला
लावुनि प्रेमें धरिले त्यांनीं बापू चरणाला

× × ×

महार झाला गुप्त तेथुनी, पुनः न तो दिसला
हरहर होता विठू महार तो कळले बापूला

पृथ्वी–१०३

कपर्दिक नसे जरी मुळिच बापुच्या सन्निध
रमेश पुरवी तया उघड सत्य हें दावित
कधी न पडतें उणें मदिय भक्त जो अर्जुना
अनन्य भजतां मला तदिय नाश केव्हांच ना.

प्रसंग :–एकदां हैद्राबादीं राममंदिरांत एकादशीला भजन चाललें होतें. बरींच भजनीमंडळी जमली होती. त्यांपैकी एक श्री. श्रीधरराव शेकदार

हेही होतें. ते एक गवळण म्हणूं लागले. भटजी बापू हळूंच त्यांचे मागें येऊन बसले. म्हणण्यांत तल्लीन झाल्यामुळें त्यांना भटजी बापूंचे येणें व आपल्यामागें बसणें हें अर्थात्च कळलें नाहीं. गवळण गाऊन पूर्ण होतांच भटजी बापूनें एकदम त्यांच्या पाठीवर थाप मारली व 'शाबास'! तूं गवळण कितीतरी सुंदर, गोड आवाजांत म्हणालास्‌? मला ती पुनः एकवशोल काय ? (वास्तविक ती गवळण म्हणतांना त्याला ताल किंवा सुर यांचा मेळ नव्हता.) असें असूनही केवळ त्यास उत्तेजन द्यावें एवढाच भटजी बापूंचा उद्देश होता. त्याचे अल्पगुण कां होईना, आपण त्यास चांगलें म्हटल्यास त्याला उत्तेजन मिळून तो पुढें चांगलें नियमबद्ध गाणें म्हणूं लागेल एवढेंच तत्त्व भटजींच्या मनांत होते.

पुढें कर्मधर्मसंयोगानें व बापूंच्या आशिर्वादानें तो उत्तम गवई झाला हें सांगणें नको. त्याबद्दल असेंच म्हणावें लागेल.

शा. वि.–१०४

लोकांचे जरि अल्पही गुण तया मेरुपरी वानिती
लोहा, स्पर्श करोनि हेम करिती साधू परीसापरी
दृष्टांती मज वाटतें, कमिपणा साधूस येतो इथें
साधू दे परिसत्व थोर अपुलें, दिव्यत्व यातें कुठें ?

जसें भटजी बापू होते तशीच त्यांची सुशील भार्या सौ. सावित्रीही होती. त्यागाचे बाळकडूच त्या सर्व कुटुंबाला ईश्वरानें पाजलें होतें असें कित्येक उदाहरणावरून सिद्ध होते. अशांचेंच जीवन विजयी जीवन होय

पद्य–१०५ ( राग–भीमपलास, ताल–त्रिताल )

तेंच खरोखर विजयी जीवन ।। गरिबासाठीं झटती कणकण
राजारायान भागानगरीं ।। प्रसिद्ध होते औदार्यी जनीं ।। १
मेहुण म्हणुनी बापू संता ।।पाचारीती शुभ दिनि एक्या ।। २
भोजन झालें निरोप घेतां ।। प्रकार घडला घ्यावें ध्यान ।। ३

जरतारि वस्त्रें बापुसी ती ।। सुवर्ण लेणी साध्वीसी ती
मिरवित दोघां गृहीं पोचवी ।। नवल करीती नरनारी जन ।।

त्याच रात्री सावित्रीबाईची एक शेजारीण आपल्या पतीला म्हणाली:–

ब्राह्मण स्त्री: –                म. माला–१०६

किती भाग्य वर्णू जगीं बापुजीचें
तसें हो सतीचें तया पत्निचें
वस्त्रें दिलीं बापुतें काल कोणी
सुवर्णें सतीच्या करीं घातलीं
आम्हां करंट्या ! कुठें भाग्य लाभे
सदा भालि दारिद्र्य हें आमुचें
सावित्रिभार्या तदा कान देतां
पडे बोल कर्णींच त्या बाइचें

बापू भटजी रात्रीं घरी आले. तेव्हां सावित्रीबाईनें त्या शेजारणीचें बोलणें पतीस सांगितलें. बापूंना तें ऐकून फारच आनंद झाटला व ते म्हणाले, "उद्यां आपलें घरीं त्या नवराबायकोस दांपत्य सांग. भोजन घालून आपण हीं वस्त्रें व तुला मिळालेलें लुगडें व दागिनें त्यांना देऊन टाक. ही लक्ष्मीची पीडा आपणांस नको.

सावित्रीबाईनेंही आनंदानें रुकार दिला. दुसरें दिवशी त्या दोघांना भोजनास बोलावून तीं वस्त्रे ब्राह्मणास व लुगडे व सर्व मिळालेलें दागिनें त्या सुवासिनीस देऊन टाकले.

पृथ्वी–१०७

उटी भरि तिची मुदें त्वरित बापुची कामिनी
सुवर्णवलयें करीं, बघुनि हर्षली भामिनी
सुवर्ण गणि मृत्तिका जगति, संत ते वंद्य हो
करी म्हणुनि वंदना सतत त्या सुखें देव हो

यालाच "धन्यो गृहस्थाश्रमः" म्हणतात. विशेषतः स्त्रियांना दागिन्यांचा फार लोभ असतो. सौ. सावित्रीबाईची वृत्ति किती सात्त्विक व त्यागी होती हें वरील उदाहरणावरून कळेलच. याच्या उलट एक मजेदार उदाहरण दिल्यास सावित्रीबाईच्या त्यागाचे महत्त्व कळेल. एका बाईला आपलें ऐश्वर्य दाखविण्याची फार हौस. एकदां तिनें सोन्याच्या बांगड्या करवून आपल्या हातांत घातल्या. पण कोणीही त्यांचे कौतुक करीना. त्या बाईस फार राग आला. रागाच्या भरांत तिनें आपलें घर पेटविलें. ज्वाळा पसरूं लागल्या. प्रकाश पसरतांच त्या बाईनें आपले हात पुढें केलें व म्हणूं लागली, 'इथें पाणी टाका' तिकडे टाका. हेतु हा कीं आपल्या बांगड्या त्या प्रकाशांत लोकांना दिसाव्या म्हणून हात पुढें करूं लागली. त्यांत अेक धूर्त मनुष्य होता. त्यानें तें ओळखलें व बाईस म्हणाला, "बाई ! या इतक्या सुंदर बांगड्या तुम्ही केव्हां केल्या ? त्या तुमच्या हातांत फारच शोभतात ! हें अैकतांच ती बाई हर्षानें व घर आपण होऊन जाळल्यामुळे खेदानें म्हणाली, 'बाबा ! इतकें दिवस झालें पण माझ्या बांगड्याबद्दल कोणीही कौतुक करीना. म्हणून माझ्या घराला मला आग लावावी लागली ! पहा हें चित्र ! पहा ही राक्षसी हौस व पहा आमच्या भटजी बापूंच्या सती सवित्रीचे चित्र व तिनें केलेला त्याग !

बापूंना अनुरुप अशीच भार्या होती.

प्रसंग ९:-भटजी बापूंचा मुलगा गोपीनाथदादाही असाच निस्पृही व त्यागी होता. अेक ब्राह्मण त्यांच्या घरीं आला व म्हणाला, माझें धोतर फाटलें आहे. तुमचें धोतर मला द्या. गोपीनाथ दादानें घरांतील जरीचे धोतर ब्राम्हणास दिले. हें बापूंना कळलें. ते म्हणाले, दादा काय ब्राम्हणाला अेकच धोतराचे पान दिलेस ! दुसरेंही नेऊन दे. गोपीनाथ दादानें ब्राम्हणाचा शोध केला पण दोन चार दिवस त्याची गांठच नाहीं.

अेके दिवशीं त्या रस्त्यांत त्या ब्राम्हणाची गांठ पडली. गोपीनाथ दादा अेका गल्लींत गेले व आपले उपरणें नेसून तें दुसरें पान फेडून त्या ब्राम्हणास आनंदानें दिलें. याला म्हणावें सत्पुत्र !

पद–१०८

तारि कुलासी सत्पुत्र म्हणावे त्यासी
अल्पवयी त्या ध्रुव बाळानें । स्थान घेतलें नभी तपाने .
ईश जयाते स्थापी मानें । अढळ पदाते ॥ १ ॥
असख्य वर्षे यत्न करोनी । आणि सुरनदि जो या भुवनी
धन्य भगीरथ सज्जन म्हणुनी । वंदिति त्यासी ॥ २ ॥
पित्राज्ञाते पूज्य मानुनी ॥ शस्त्रें वधिली जेणें जननी
पुनरपि पुण्यें सजीव करुनी । घे कीर्तीसी ॥ ३ ॥
सौख्य मिळावें निजजनकाला । तिलांजली दे निज सौख्याला
इच्छा मरणी भीष्म पितामह । वंदिति ज्यासी ॥ ४ ॥
मदन जयाला थरथर कांपे ॥ तेजोनिधि जो तप: प्रतापें
रंभा पावुनि पश्चात्तापे ॥ जाय गृहासी ॥ ५ ॥
लोक मराठा मिळवुनि सारा । महाराष्ट्राच्या धर्म प्रसारा
तन मन अर्पुनी राखी धर्मा ॥ द्विज सूत्रासी ॥ ६ ॥
बुद्धि वैभवें जनास दीपवी ॥ स्वातंत्र्यास्तव तनूस झिजवी
लोकमान्यपद जगीं मिळवुनी ॥ ठेवी तनुसी ॥७ ॥
देशास्तव जे फाशीं चढले ॥ स्वातंत्र्यास्तव सतत झुंजले
मर्दपणाने झुंज खेळती ॥ जे मृत्यूशीं ॥ ८ ॥

सबंध घराणेंच बापूचें असें होतें हे बापूचें केवढें पुण्य. यालाच खरें गृहस्थाश्रम नांव देतां येईल. असें त्यागमय जीवन भटजी बापूच केवळ नव्हे तर त्यांची सर्व कुटुंबीय मंडळी व्यतीत करीत होते.

प्रसंग १०:–अेकदां अेक गृहस्थ भटजी बापूकडे आले व म्हणाले 'महाराज मला पंढरपूरला जावयाचे आहे; आपणही चलता ना ! बापू म्हणाले, "बरें चला."

ते पायींच निघाले. मध्यें मुक्काम करीत करीत अेका खेड्यांत थांबले. त्या दिवशीं होती अेकादशी. रात्रौ जागर झाला. भजन व बापूचे सुंदर गायन झालें. सर्व मंडळीं संतुष्ट झाली. पण भटजींना मधून मधून अेक चिंता त्रास देऊं लागली.

उद्यां द्वादशी ब्राम्हण–भोजन तर झालें पाहिजे पण आपल्याजवळ तर कवडीही नाहीं. काय करावें ? या चिंतेत सकाळ झाली. द्वादशीचा दिवस उजाडला. भटजी प्रभूची प्रार्थना करूं लागले. तुलाच माझी काळजी आहे. मी कशाला चिंता करूं.

पद–१०९ (राग असावरी)

शंकरा ।। राखी माझी लाज ।।ध्रु०।।

आजवरी ना व्रत मम चुकले ।। द्वादशि भोजन द्विजास दिधले
विघ्न कधीं ना कुठेच आले ।। काय करुं मी आज ।। १ ।।
भास्कर अस्ता, गेला, सारे ।। पशुपक्ष्यादी निद्रित सारे
मध्य रात्रि त्या ऋषिवर आले ।। बोल वदे समयास ।। २ ।।
भूक लागली मजला भारी ।। भोजन द्यावें क्षुधित हो सारी
असें अैकतां तूं कंसारी ! ।। राखिलीस ना लाज ? ।। ३ ।।
द्वादशि जरी ही घडे न मजला ।। प्राण ठेवणें योग्य मला ना
धांव संकटीं देवा, ये ना ।। सुचे न कांहीं काज ।। ४ ।।

अशी करुणा भाकताच चमत्कार काय झाला.

गांवकरी :– शिखरिणी–११०

बापू आले जवळ अपुल्या गांवि हें ऐकुनीया
'जाऊं सारे मिळुनिहि चला दर्शना साधुचीया
घेऊ त्यांचा शुभदिनिंहि या, द्वादशीचा प्रसाद
घेती गाड्या भरुनिहि शिधा अैकिली भक्त साद

शा. वि.–१११

साष्टांग प्रणती सहर्ष करिती बापूस ते सज्जन
आले संत घरा सुभाग्य म्हणति झाले अम्हां दर्शन
आहे द्वादशि आज सर्व आमुचा घ्या हा शिधा तोडका
द्यावा आज अम्हां प्रसाद तुमचा ही प्रार्थना आयका

**गद्य** :–बापूंच्या नेत्रास पाणी आले ।। अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।

अभंग–११२

राखिली तूं माझी ।। लाज विठू राया ।
पावन तूं केले दुर्भाग्या या ।। ध्रु.
द्वादशीचा नेम ।। पूर्ण केला देवा ।
भक्ताची ही लाज ।। पंढरिराया ।। १ ।।
स्वस्थ तुम्ही जेवा ।। गोड करा अन्न
विठूची, न माझी ।। हीच देव दया ।। २

ओवी–११३

झालें मिष्टान्न भोजन
संतुष्ट झाले सज्जन
बापूते पूर्ण समाधान
जाहलें अंतरीं

पृथ्वी–११४

कितीक तरि बापुच्या चरितिं दाखवूं दाखले ?
खलें जरिहि निंदिलें, तरिहि तत्व ना सोडिलें
जिथें जनन घेति हे, सुजन, धन्य का देश ना ?
करी तन मनें धनें सतत देव त्या वंदना

धान्य वगैरे जे अन्नदानाकरितां कामाला येईल तेवढेंच श्री. भटजी बापू ठेवून घेत. बाकी सोनें नाणें नाहीं.

पद–११५

मात्र देणग्या महाराजांना कार्यकारणी दिल्या
कामापुरत्या त्याच ठेविल्या पुढील कार्याला
कालक्रमणा अशी चालली भोग न परि चुकले
वृद्धपणीं ते अंध जाहले कर्म न परि चुकले

ओवी–११६

एकेक लोटूं लागे दिन । महाराज झाले अतिक्षीण
लोक बोलती चतुर्थाश्रम । द्यावा महाराजास

आर्या–११७

आश्रम चतुर्थ दिधला कृष्णानंदाभिधान त्या दिधलें
बुद्धिभ्रंश जहाला देहाचें भान ना तया उरलें

ओवी–११८

शके १८५४ । एकादशी लागतां जाण ।
वैशाखवद्यीं ठेविला प्राण । महाराजांनी

अंत्ययात्रा :–

कटाव–११९

महाराजांनीं देह ठेविला । कळतां वार्ता ही जनतेला
धावुनि आले त्या समयाला । थोर सान ते सर्वचि आले
भाग्यनगर ते सर्व लोटले । कुणी आदरें दर्शन घेती
कुणी टपटपा अश्रु गाळिती । कुणी सुगंधी गंध टाकिती
उंच मखर तें भव्य बनविलें । महाराजांना त्यांत बसविलें
भजनि मंडळी अग्रभागिं ती । टाळमृदंगासवें चालली

गुलाल लाविती सकल कपाळीं। कुणी उधळिती पैसे त्यावरी
हिंदू-मुस्लिम सर्वचि जमले। मशिदी वरूनी वाजत गाजत
महाराजांची यात्रा चाले। बागेंमध्यें सर्व परतले
धर्मशास्त्र तो विधी करोनी। खरसोला ते धन्यचि वदती
दर्शन घेती सर्व शेवटीं। दोन मोहरा खालि ठेविती
महाराजातें प्रणाम करिती। टपटप सारे अश्रु गाळिती
त्या समयाला आलेहि देव बघण्याला.

आर्या-१२०

दर्शन अंती घेतां गहिंवरले सर्व लोक ते रडती
झाला अंधार अतां भाग्यश्री नष्ट होय नगरीची

भैरवी-१२१ (ताल-दादरा)

अल्पमती, महाराजा! शरण तव पदा
पदिं लोळण सतत करी। मोक्षसंपदा
तव चरित्र वर्णन ना, शक्य हें मला
तूंच दिली बुद्धि मला शकुन जाहला
अल्पकृती अर्पणही करितसे मुदा
काया मम सतत पडो साधु तव पदा
देव तूंच ज्ञानदेव, नामधारि मी
देव असे पतित तरी, दावि तव पदा

-समाप्त-

# ‘देवकन्या’ पुष्प १ लें

## विद्वान रसिकांचे अभिप्राय

(१) सहज परिचयास व गायनास ही ‘देवकन्या’ गोड आहे. आर्य संस्कृति व आधुनिक देशस्थिति यांची सुंदर दृश्यें श्री. देवांनीं यांत रंगविलीं आहेत. यांचें इतरहि काव्य व चरित्रें अद्याप प्रकाशित व्हाव-याचीं आहेत. तीं अशीच प्रसिद्ध झाल्यास कीर्तनकारालाच नव्हे तर महाविद्यालयांतून अभ्यासक्रमांत गोंवण्यासाठीही त्यांचा चांगला उप-योग होईल.

**--शं. वा. दांडेकर, ‘प्रसाद’ पुणें.**

(२) उस्मानाबाद येथील प्रसिद्ध कवि श्री. श्री. रा. देव यांचा काव्यसंग्रह ‘देवकन्या’ मी संपूर्ण वाचला. त्याबद्दल मला जें वाटले ते असे.

‘या पुस्तिकेंत त्यांच्या (३३) काव्यकृति संकलित केल्या आहेत. ह्याच त्यांच्या कन्या होत. रसिकांनीं त्यांच्या या कन्यांचें कौतुक करावें इतपत त्या देखण्या व सुशील आहेत हें कबूल करावे लागेल.

पित्याचें ठिकाणीं असलेली धार्मिक वृत्ति, संस्कृत्याभिमान व देश-भक्ति हे गुण त्यांच्या अनेक कवितांतून दिसतात. जुन्या नामांकित घराण्यांतील मुलींच्या ठिकाणीं दिसून येणारा टापटीपपणा व भारदस्त-पणा त्यांच्यात आहे. देव यांची ही कृति आपल्या वैशिष्टयानें रसिकांच्या आदरास पात्र होईल असा मला पूर्ण विश्वास वाटतो.

**बहुतेक सर्वच कविता वाचनीय आहेत.**

त्यांतल्या त्यांत ‘शिवाजीची शतघ्नी (क २) कवि (८) संक्रांत (११) मत्सर (१६) जन्मांध (२०) शक्य ना ते टाळणें (२५) विविध चित्रें (२६) तुलना (२७) प्रणाम (३०) जीवन (३१) लोकसत्ताक दिन (३२) या काव्यांतून कवीची उत्कट देशभक्ति, संस्कृतिप्रेम व स्वातंत्र्यलालसा स्पृहणीय रीतीनें परिणामकारक भाषेत प्रकट झाली आहे.

‘तुलना’ काव्यांत भगवंताच्या साह्याची याचना फार मृदु पण मार्मिक भाषेंत केली आहे.

या लहान काव्यांतील कल्पना गोड व हृदयंगम आहे व त्यांतून प्रसाद ओतप्रोत भरलेला आहे.

शेवटल्या चार पंक्तींत भक्ति, वत्सल व करुण या रसांचा मनोहर संगम झाला आहे.

"मी तुझा हें समज मातें, देइ शांती मानसीं
सोडुनिया तूं दयाला ! शरण कोणा जाउ मी ?
कमल उमलें क्षणभरी कां, सूर्य नसतां अंबरी
तेंवि नसता साह्च तूझें, राहुं कैसा येथ मी"

त्याचप्रमाणें 'फुलाचें मागणें' (क. २८) यांत कवीची वीर भक्ति दिसून येते:–

"तोडुनीया बागवाना ; मार्गि अैशा फेंकणें
विनति माझी अैकणें
वीर जाती ज्या सुमार्गें प्राण द्याया आपुलें
पंथि अैशा फेंकणें
पायिं तुडवो मार्गि जातां, वीर गाणीं गायनें
व्यर्थ ना माझें जिणें
ही मनीषा पूर्ण करुनी रोम रोमीं खेळणें
हेच देवा मागणें

त्याचप्रमाणें 'थोर कोण' यांतील

"बोध घ्यावा हा जनानी संपदा ज्या लाभली
अतिथि येवो सदनिं कोणी
मान द्यावा त्यासही ॥
देव धरि त्या उत्तमानें आदरानें मस्तकीं
वैभवानें चढुनि जाती नीचता ये त्यास कीं ॥"

प्रणाम (३०) जीवन (३१) यांतील विषय अनुक्रमें नेताजी, सुभाषचंद्र बोस, यांची प्रशंसा, व तेजस्वी जीवन हे आहेत. दोन्हींही प्रकरणें सरस उतरलीं आहेत.

"उदबत्ती ही जळे परंतु सुगंध दे इतरां
शेवटची ही घटिका तीचा व्यर्थ न जाय जरा"

अशा कानांत सतत घुमत राहणाऱ्या पंक्ति या पुस्तकांत अनेक ठिकाणीं आहेत.

लोकसत्ताक दिनानिमित्त रचलेल्या मंगलाष्टकांतील प्रत्येक पंक्ति देशभक्तीच्या उदात्त भावनेनें रसरसली आहे. त्या मंगलाष्टकाचा शेवट.

" भारत आमुचा वैभव शिखरीं
तशी आमुची ध्वजाहि शिखरीं
फडको फडफड सदैव तेजें
दिपवो जगता अखंड काल

या हृदय उचंबळून सोडणाऱ्या पंक्तींनीं केला आहे.

ग्रंथाच्या आरंभीचें गणेशवंदन व अंतीं केलेलें शारदा वंदन हें छोटे पण काव्यमय व भक्तिभाव उद्दीपित करणारें आहे.

काव्यांत कांहीं दोषस्थलेंही आहेत. त्यांतील फक्त अेकाचाच निर्देश करतो.

'विविध चित्रें' (२६) या काव्यांत पित्याचे संतोषार्थ आजन्म ब्रम्हचारी राहण्याच्या भीष्माच्या प्रतिज्ञेचा उल्लेख आला आहे. त्यासंबंधीं कवि लिहितात.

' शतनूच्या आशस मान द्यावा
म्हणुनि भीष्में **सोडिली** प्रियाजाया '

'**सोडिली**' या शब्दानें भीष्माला पूर्वीं असलेली जाया त्यानें बापाकरितां सोडिली म्हणजे टाकून दिली असा अर्थ होतो. त्यानें मुळीं विवाहच केला नाहीं हा जो कवीचा अभिप्रेत अर्थ तो मुळींच निष्पन्न होत नाहीं. रामानें रजकाच्या अपवादावरून सीतेला सोडले, तसा प्रकार भीष्माचा नव्हता.

पुढल्या पंक्तींत 'ब्रह्मचर्या आजन्म पाळि थोर' हे शब्द आल्यानें मागल्या पंक्तींतील 'सोडिली प्रिया जाया' या शब्दांनीं केलेली रसहानि व अर्थ वैपरित्य भरून निघत नाहीं. कांहीं ठिकाणीं युक्त शब्दरचना न झाल्यामुळें रसभंग झाला आहे.

पण अेकंदरींत अशी स्थळें फारच थोडीं आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ वि: (४८)..............
क्रमांक ........................ नों: दि: ..............

आंब्याच्या झाडावर अेक हजार मधुर फळें असतांना त्यांत १०-५ डागाळलेलीं असलीं तरी तेवढ्यामुळें त्या झाडाच्या सुफलत्वाला बाध येत नाहीं.

अेकंदर या देवकन्या आपल्या देखणेपणामुळें व मोहकपणामुळें बालवयांत शोभादायक दिसणाऱ्या थोड्याशा अल्लडपणामुळेंही रसिकांची मनें आकर्षून त्यांच्या पित्याला त्यांच्या भवितव्याबद्दल चिंता करण्याचें कांहींच कारण नाहीं असें मला वाटते. मजकडे त्यांनीं आपलें पुस्तक पाठविलें याबद्दल मी त्यांचें मन:पूर्वक आभार मानून लेखणीस विराम देतो.

—लोकनायक माधव श्रीहरी अणे, पुणें.

(३) श्री. देव यांनीं 'देवकन्या' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला आहे. १९४८ पर्यंत निझामच्या राजवटींत हे शिक्षक व डे. इन्स्पेक्टर असल्यामुळें व या राजवटींत नागरिक स्वातंत्र्यावर कडक निर्बंध असल्यामुळें त्यांना आपला कवितासंग्रह प्रसिद्ध करतां आला नाहीं. तथापि कीर्तनाच्या निमित्तानें व अन्य प्रसंगानें त्यांचें काव्य मराठवाड्यांतील रसिकांपर्यंत यापूर्वींच पोंचलें होते. संस्कृत साहित्यिकाच्या जगांत विद्यार्थि दशेंतच त्यांनीं प्रवेश केला होता. मॅट्रिकच्या परीक्षेंत त्यांनीं लीलेनें पहिला क्रमांक संस्कृत व मराठी विषयांत मिळविला होता. नोकरी करूनच त्यांनी पदवी परीक्षाही दिली. ते यशस्वी प्रेमळ शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांचीं मनें त्यांनीं प्रेमळ स्वभावानें व गोड शिक्षणानें ओढून घेतलीं होतीं. कीर्तनकार म्हणूनही ते लोकप्रिय झाले. त्यांच्या काव्यांवर या दोन्ही व्यवसायांचा परिणाम दिसून येतो. त्यामुळें त्यांच्या कविता आधुनिक कवितांहून अगदीं वेगळ्या वळणाच्या दिसतील.

संवेदनशील मन, सुश्लिष्ट व प्रौढभाषा व राष्ट्रोद्धाराची तळमळ यामुळें साहित्यांतील सत्यम्, शिवम् व सुंदरम् या त्रिविध प्रकारांतील तत्वांचा आविष्कार त्यांच्या बहुतेक कवितांतून दिसून येतो.

मराठवाड्यांतील रसिक जनता त्यांच्या परिश्रमांचे चीज करील यांत शंका नाहीं.

विवेक, औरंगाबाद.

दा. क्र. ८०११

## 'देवकन्या' (पुष्प १ लें) वरील

### — अभिप्राय —

श्री. देवांची 'देवकन्या' साधी भोळी, जुन्या वळणाची पण शुद्ध भावाची आहे. धर्मभक्ति, देशभक्ति हे तिचें स्थायीभाव आहेत.

'शिवाजीची शतघ्नी,' 'सांवरही माऊली,' 'मुक्त सिंह,' प्रणाम, व मंगलाष्टक यात तो भाव प्रकट झाला आहे. 'गरीब गुराखी' यांत गरीब गुराख्याबद्दल तिला दया येते. 'मेघांची कृतघ्नता' या काव्यांत कल्पना विलास आहे. तो सुंदर साधला आहे. मत्सर, जीवन, पश्चात्ताप इत्यादि कवितांत थोर नीतितत्वांचा ती उपदेश करते. 'तिळ न चालते मन्मति' 'कवि' या कविताही वाचनीय आहेत. कवितेंतील अत्यल्प दोष तिच्या अनेक गुणांत लुप्त होतात. तसेंच येथें झालें आहे.

भावनांच्या शुचितेमुळें, प्रासादिक शब्दरचनेमुळें व गेयता या अनेक गुणांमुळें ही 'देवकन्या' श्रोत्यांना निश्चित रिझवील यांत शंका नाहीं.

—प्रा. शं. दा पेंडसे, नागपूर.
अध्यक्ष साहित्य संमेलन, पंढरपूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .............. वि: ........ ... ..
क्रमांक .......... नों: वि: ..............

## 'देवकन्या' (पुष्प १ लें) वरील

## – अभिप्राय –

जुन्या परंपरेंतील मार्ग आपण पुढें चालवत आहांत व तोही यशस्वी रीतीनें असेंच कोणीही रसिक म्हणेल.

श्री. देवांची भाषा, सोपी, प्रसाद-युक्त म्हणूनच रसाळ झाली आहे यांची 'देवकन्या' मराठी भाषेंत तळपत राहावी अशीच आहे.

—वा. द. गोखले, चिटणीस
महाराष्ट्र सा. परिषद, पुणें.

●

श्री. देवांची 'देवकन्या' स्वरूप सुंदर, स्वभावानें सात्विक व वळणानें

'रांतील

स्कृतीस

REFBK-0008911

REFBK-0008911

ळक

डे. डायरेक्टर, हैदराबाद.